वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. ५ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# खंडणीसाठी धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर बैठक

## माहिती खोटी ठरल्यास राजकारण सोडतो; सुरेश धस यांचं चॅलेंज



### बीडचा बिहार नाही हमास, तालिबान केला; सुरेश धसांचा संताप

पुणे , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली, यामुळे आता राज्यात चांगलंच वातावरण तापलं आहे, आरोपींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी राज्यभरातून होत आहे. आज (५ जानेवारी) पुण्यात आक्रोश मोर्चाच आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाला सर्वपक्षीय नेत्यांसोबतच संतोष देशमुख यांचे कुटुंबही उपस्थित आहे. या सर्वपक्षीय मोर्चात भाजप आमदार सुरेश धस यांनी भाष्य

▶▶ पान २ वर

### खंडणीच्या आरोपींना पुण्याच्या एका नामांकित रूग्णालयात उपचारासाठी दाखल कोणी केले?

पुणे , (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या आरोपींना अटक करून कठोर शिक्षा देण्याच्या मागणीसाठी पुणे शहरात सर्वपक्षीय मोर्चाचं आयोजन करण्यात आलं होतं. या मोर्चावेळी केलेल्या भाषणात भाजप आमदार सुरेश धस यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. पवनचक्की कंपनीकडे खंडणी मागण्यासाठी धनंजय मुंडे यांच्या सरकारी बंगल्यावर बैठक झाली होती आणि नंतर निवडणुकीसाठी या कंपनीकडून ५० लाख रुपये घेण्यात आले, असा आरोप सुरेश धस यांनी केला आहे.

धनंजय मुंडेंवर आरोप करताना तारखांचा उल्लेख करत सुरेश धस म्हणाले की, १४ जून रोजी अवादा कंपनीचे अधिकारी आणि वाल्मीक कराड, नितीन बिक्कड यांची मुंडेंच्या परळीतील बंगल्यावर बैठक झाली. या बैठकीनंतर

▶▶ पान २ वर

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

# बीडमधला तो नामांकित राजकीय व्यक्ती कोण?

## ज्यांनी या आरोपीला त्या रूग्णालयात भरती करण्यासाठी प्रयत्न केले याची सीआयडी एसआयटीने चौकशी करण्याची मागणी जनतेतून होत आहे

# पुण्यात जनआक्रोश मोर्चा, कराडच्या फोटोला जोडे मारो आंदोलन

### 'कराडला फाशी झालीच पाहिजे'

पुणे , (दिव्य न्युज):- सरपंच संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ पुण्यात लाल महाल ते जिल्हाधिकारी कार्यालय जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. वाल्मिक कराडला फाशी झालीच पाहिजे, मारेकरांना कठोर शिक्षा द्या, अशी घोषणाबाजी करत हजारो नागरिक या मोर्चात सहभागी झाले होते.

सरपंच संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांची निर्घृण हत्या करण्यात आली. बीड हा दहशतीचा बालेकिल्ला झाला आहे. कराडसारखे गुन्हेगार मोकाट फिरू लागले आहेत. अत्यंत वाईट प्रकारे यांची हाती करण्यात आली आहे. यामध्ये

पान २ वर






# मी जर प्रेस घेतली तर खासदाराची चड्डी सुध्दा जाग्यावर राहणार नाही

## सपोनी गणेश मुंडे यांच्या पोस्टमुळे पोलीस दलात वादळ

बीड , (दिव्य न्युज):- वादग्रस्त सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांनी 'बीड पोलीस प्रेस ग्रुप'वर शनिवारी सायंकाळी एक पोस्ट केली. ज्यामुळे पोलीस दलात वादळ उठले. 'या खासदाराची चड्डी सुध्दा जागेवर राहणार नाही, मी जर प्रेस घेतली तर' अशी पोस्ट मुंडे यांनी केल्याने त्यांचा निशाणा नेमका कोणावर आहे, आणि मुंडे सारखे पोलीस अधिकारी कोणत्या खासदाराला धमकीची भाषा वापरत आहेत, अशी चर्चा सुरु झाली आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथे ९ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्रात संताप व्यक्त केला गेला. या हत्येचा तपास आता सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन पातळीवर सुरु झालेला आहे. या हत्येच्या पाठीशी जे राजकीय लोक आहेत, त्यांच्याबद्दल जनमाणसात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आ.सुरेश धस, आ.संदीप क्षीरसागर, आ.प्रकाश सोळंके यांच्यासहीत सर्वांनीच आरोपींना कठोर शिक्षा करण्याची मागणी केलेली आहे. दरम्यान बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करत बीडमधील सपोनि.गणेश मुंडे आणि सपोनि.दहिफळे या दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांचे कॉल रेकॉर्ड तपासण्याची मागणी केली आहे. खासदार सोनवणे यांच्या मागणीनंतर बीड पोलीस खळबळ उडाली आहे. दहिफळे आणि मुंडे या दोघांबद्दलही सर्व सामान्यासोबतही पोलीस दलात देखील फारसे चांगले

▶▶ पान २ वर

# तू एकदा पत्रकार परिषद घे

## बजरंग सोनवणेंचे कोणाला आवाहन?

पुणे , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील केज तालुक्यामधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा तपास फार वेगाने सुरू आहे. परंतु, त्यांना लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी राज्यभरात विविध ठिकाणी मोर्चे काढण्यात येत आहेत. आज, रविवारी (०५ जानेवारी) पुण्यातील लाल महाल ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत सकल मराठा समाजाच्यावतीने मोर्चा जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी सभेला संबोधित राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांना पत्रकार परिषद घेण्याचे आवाहन केले आहे.

जनआक्रोश मोर्चात उपस्थितांना संबोधित करताना बजरंग सोनवणे म्हणाले की, मी राजकारण करायला या मोर्चामध्ये सहभागी झालेला नाही. या हत्यामागे जो मास्टरमाईंड आहे,

▶▶ पान २ वर



# स्थानिक स्वराज्य निवडणूका प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयात

## बीडचे उल्हास संचेतींचा याचिका कर्त्यांध्ये सहभाग

पुणे , (दिव्य न्युज):- राज्यात विधानसभेची निवडणूक होताच वेध लागतात ते स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे. गेल्या चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झालेल्या नाहीत. यामुळे तिथे प्रशासकीय राज आहे. यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तातडीने घेण्याची मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे प्रतिनिधीत्व त्यांचे पुणे विभाग प्रमुख विजय सागर यांनी अधिवक्ता सत्या मुळ्ये यांच्यामार्फत जनहित याचिका दाखल करून राज्य निवडणूक आयोगाला राज्यातील दीर्घकाळ प्रलंबित महापालिका निवडणुका तातडीने घेण्याचे निर्देश मागितले आहेत. यावर २२ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालय निकाल देणार असून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याची माहिती देखील मिळणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था गेल्या दोन ते चार वर्षांपासून प्रशासकांच्या हाती

▶▶ पान २ वर





बीडः शहरातील अंबिका चौक ते कार्तिकी लॉज पर्यंतच्या सिमेंट रस्ता व नाली कामाची पाहणी केली. कामाचा दर्जा चांगला राहण्यासाठी संबंधित यंत्रणेला सुचना दिल्या. काम लवकरात लवकर पुर्ण करून नागरिकांना रहदारीसाठी रस्ता सुरू व्हावा यासाठी तात्काळ प्रयत्न करण्याचे निर्देश दिले.

### 'विहिरी'तील कोट्यवधींच्या घबाडावर बाहुबली गब्बर

# राखेतील परळीत 'शांतता राखा'!

बीड , (दिव्य न्युज):- वैद्यनाथाची धार्मिक परळी पुढे गोपीनाथ मुंडे यांच्या नावाने राजकीय पटावर चर्चेत आली. तिची औद्योगिक ओळख औष्णिक वीज केंद्राची. या केंद्रातून निघणाऱ्या राखेभोवती परळीचे अर्थकारण, राजकारण आणि समाजकारण तरंगते. राखेतून होणाऱ्या कोटच्यवधी रुपयांच्या व्यवहारावर वाल्मीक कराड या एकाच व्यक्तीचा प्रभाव असल्याचे आरोप भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केल्यानंतर यावर राज्यस्तरीय चर्चा सुरू झाली. पण त्यावर परळीकरांची प्रतिक्रिया एकच'श्शऽऽऽ शांतता राखा!'

परळीमधील वीज केंद्राच्या तीन युनिटमधून ७५० मेगावॉट वीज निर्मितीच्या प्रकल्पातून किती राख निर्माण होऊ शकते, याची गणिते कोळशाच्या प्रकारावर अवलंबून आहेत. पण एकूण जाळल्या जाणाऱ्या कोळशाच्या ४० टक्के राख तयार होते. कोरडी राख सिमेंट कंपन्यांना ५६२ रुपये प्रति टन दराने विकली जाते आणि

▶▶ पान २ वर

# अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केल्या चार पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील केज तालुक्यामधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा तपास फार वेगाने सुरू आहे. परंतु, त्यांना लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी राज्यभरात विविध ठिकाणी मोर्चे काढण्यात येत आहेत. या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी नेमण्यात आली आहे. तर, सीआयडी आणि न्यायालयीन चौकशी सुद्धा या प्रकरणी करण्यात येत आहे. या घटनेनंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे तत्कालीन एसपी अविनाश बारगळ यांची बदली केली आणि त्यांच्या जागी नवनीत कावत यांची नियुक्ती केली. कावत यांनी या जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्यापासून चौकशीस सुरुवात केली असून आज रविवारी (ता. ०५ जानेवारी) त्यांनी बीड पोलीस दलामध्ये मोठे फेरफार केले आहेत. बीड पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी पोलीस दलातील चार अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत.



सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. ज्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशान्वये या प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले. परंतु, पोलीस अधीकक्षक कावत यांनी सक्तीच्या रजेवर

▶▶ पान २ वर


दिव्य वार्ता



## बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ परभणीत काढलेल्या मूक मोर्चात सर्वपक्षीय नेत्यांची मागणी

# धनंजय मुंडेंची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा





परभणी, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ परभणीत शनिवारी सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वधर्मीय, सकल मराठा समाज व अन्य संघटना व प्रतिष्ठानांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढला. सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी आणि धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्या, अशी सर्वपक्षीय नेत्यांनी मागणी केली. दरम्यान, देशमुखांच्या कुटुंबीयांना धक्का लागला तर धनंजय मुंडेंना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी मोर्चात बोलताना दिला.

वाहनांच्या या रांगांमुळे गंगाखेड, जिंतूर, पाथरी रस्त्यावरील वाहतूक कोलमडली. तरुणांसह महिला व आबालवृद्धांचेसुद्धा जथ्थे या मैदानावर पोहोचले. मोर्चा दुपारी १२ वाजता महाराणा प्रताप चौकमार्गे निघून जिल्हाधिकारी कार्यालयावर १ पोहोचला. यानंतर ५.३० वाजता तेथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात या मोर्चाचा समारोप झाला.

### वैभवी व भाऊ धनंजय देशमुख सहभागी

परभणी शहरात काढण्यात आलेल्या मोर्चामध्ये संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख आणि भाऊ धनंजय देशमुख सहभागी झाले होते. तसेच राजकारणातील सर्वपक्षीय पदाधिकारी या मोर्चात सहभागी झाले होते. या मोर्चाच्या माध्यमातून मस्साजोग प्रकरणात आरोपींना तात्काळ शिक्षा करण्याची मागणी देखील करण्यात आली.

### मी आतापर्यंत नाव घेऊन बोललो नाही

स्व. संतोष देशमुख यांचे बंधू कालपरवा पोलिस स्टेशनला गेले. त्यांना धमकी देण्यात आली. मी आतापर्यंत नाव घेऊन कधी बोललो नाही. माझा स्वभाव आहे कुणकुण लागल्याशिवाय मी कोणाच्या वाटेला जात नाही. संतोषभय्या आता तर गेलेतच, पण यापुढे जर त्यांचे कुटुंबीय व धनंजय देशमुख त्यांच्या कुटुंबाला जर धक्का लागला तर मंत्री धनंजय मुंडेंना रस्त्यावर फिरू देणार नाही.' **– मनोज जरांगे पाटील**

### बीडमध्ये गुंडाराज : नरेंद्र पाटलांचा आरोप

आकाला उचला, हीच आमची सर्वात महत्त्वाची मागणी असल्याचे नरेंद्र पाटील यांनी म्हटले आहे. जो नेता समाजाला वाचवू शकत नाही, तो समाजाचा नेता नाही, असे देखील नरेंद्र पाटील यांनी म्हटले आहे. या प्रकरणात धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे. बीडमध्ये गुंडाराज असून येथे विशिष्ट नेत्यांची दादागिरी सुरू असल्याचा आरोप देखील त्यांनी केला.

### सर्व आरोपींना मकोका लागायला हवा

सर्व आरोपींना मकोका लागायला हवा. आकाच्या आकानं जर काही झंटू फंटू केलं असेल तर आकाच्या आकाचासुद्धा नंबर लागू शकतो. फक्त दलित समाजाच्या पोराची बाजू घ्यायला गेला म्हणून मारला ? अजितदादा... क्या हुआ तेरा वादा... अजितदादा, तेरा वादा क्या हुआ रे... संगीत दिघोळेपासून तर आमच्या संतोष देशमुखांपर्यंत हत्येचा अजितदादा जरा हिशेब करा, असे आमदार सुरेश धस म्हणाले.

### देशमुखांना न्याय मिळेपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही

मस्साजोग या गावात जाऊन जेव्हा या घटनेची माहिती घेतली तेव्हा गावकऱ्यांनी दिलेली माहिती व स्व. संतोष देशमुख यांना मारल्याचे छायाचित्र पाहिल्यावर माझं टाळकं सरकलं. घटनेचं गांभीर्य तिथे गेल्यावर लक्षात आलं. संतोष देशमुखांना न्याय मिळेपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही.

**संदीप क्षीरसागर, आमदार**

पान १ वरून

### खंडणीसाठी धनंजय

थेट धनंजय मुंडे यांची भेट घेण्यासाठी अवादा कंपनीच्या शुक्ला नावाचा अधिकारी मुंडे यांचे स्वीय सहाय्यक प्रशांत जोशी यांच्याकडे प्रयत्न करत होते. मला डावलून थेट धनंजय मुंडेंची भेट घेण्याचा प्रयत्न केल्याने ही बाब वाल्मीक कराडला खटकली. त्यामुळे वाल्मीकने जोशीला खडसावलं आणि त्यानंतर १९ जून रोजी अवादा कंपनी आणि आय एनर्जी या कंपनीच्या अधिकाऱ्यांची धनंजय मुंडे यांच्या मुंबईतील बंगल्यावर बैठक झाली. या बैठकीत कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे तीन कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली. त्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांना ही बाब फोनवर सांगितली. वरिष्ठांनी तीन कोटींऐवजी दोन कोटी रुपये देण्यास सहमत दाखवली. त्यानंतर निवडणुकीसाठी आता लगेच ५० लाख रुपये द्या, अशी मागणी कंपनीकडे करण्यात आली आणि कंपनीने यांना ५० लाख रुपये दिले. हे पैसे तेव्हा धनंजय मुंडेंनी घेतले की वाल्मीक कराड याने हे मला माहीत नाही. धनंजय मुंडे यांच्या सरकारी बंगल्यावर खंडणीसाठी बैठका झाल्या, असा गंभीर आरोप सुरेश धस यांनी केला आहे.

अजितदादा मी तुमच्या पाया पडतो, तुमचं काय अडकलंय धनंजय मुंडेंकडे? त्यांना जाऊ द्या मंत्रिमंडळातून बाहेर. ते सातपुडा या सरकारी बंगल्यावर खंडणीसाठी बैठका घेत आहेत. ही माहिती खोटी निघाली तर मी राजकारण सोडेन. माझ्याकडे आता ३०० गायींचा गोठा आहे, राजकारण सोडून तो १००० गायींचा गोठा करेन. माझी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांना विनंती आहे की,या गोष्टीचा छडा लावा आणि प्रकरणाचा तपास पूर्ण होईपर्यंत धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळातून बाहेर काढा, असं आवाहनही सुरेश धस यांनी केलं आहे.

### बीडचा बिहार नाही

केले. त्यावेळी वाल्मिक कराड आणि संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला. 'बीडचा बिहार नाही तर यांनी हमास, काबुलीस्तान आणि तालीबान करून ठेवला आहे. जोपर्यंत संतोष देशमुखचे मारेकरी फासावर जात नाही तोपर्यंत मनात राग ठेवा', असं आवाहन करत सुरेश धस यांनी हल्लाबोल केला.

माझा रंगही काळा आहे. तुम्ही म्हणाल तर घाना देशात जाऊन राहतो. पण मग संतोष देशमुखला परत आणू शकाल का? संतोष देशमुख तिसऱ्यांदा सरपंच झाला. पण अजून त्याच्या कुटुंबीयांना राहायला घर नाही. त्यांना न्याय मिळालं पाहिजे, यात कसलं राजकारण आहे? मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यायचा नसेल तर त्यांना बिनखात्याचा मंत्री करा, असं म्हणत सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली.

आर आर पाटील, विलासराव देशमुख यांनाही राजीनामा द्यावा लागला होता. महायुतीच्या तीनही पक्षाच्या नेत्यांना विनंती करतो. यांचा राजीनामा घ्या, आमच्या मुलाला न्याय द्या अशी मागणी त्यांनी केली. मी अजितदादांवर टीका केली नाही. पण यांनी घेरा घातलाय त्यांना. ते लायकवान माणसं नाहीत. अजित दादा डोळे उघडून खाली बघा काय सुरू आहे. बारामती मतदारसंघातील तुमच्या विश्वासातली माणसे बीड जिल्ह्यात पाठवा म्हणजे सत्यता समोर येईल. तो सूरज चव्हाण माझ्यावर बोलला. अरे तो अजून बालवाडीतही नाही. तुम्ही काय बोलायचं ते बोला, मी तुमच्याकडे लक्ष द्यायचं नाही. मला संतोष देशमुख प्रकरणावरून लक्ष हटवायचं नाही, असेही सुरेश धस यावेळी म्हणाले.

### पुण्यात जनआक्रोश

कराडचा हात आहे. त्याला कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी नागरिकांनी गृहमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे. कराडला सध्या नुसती अटक करण्यात आली आहे. पण पुढची काहीच प्रक्रिया होताना दिसत नाहीये. बीडच्या प्रकरणाला सरकारने गांभीर्याने घ्यावे अशी विनंती यावेळी नागरिकांनी केली.

जोडे मारो आंदोलन

जनआक्रोश मोर्चामध्ये नागरिक आक्रमक झाल्याचे पहायला मिळाले. नागरिकांनी कराडच्या फोटोला जोडे मारून निषेध व्यक्त केल्याचे दिसून आले. जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा देत नागरिक आंदोलनात आक्रमक झाले होते. कराडच्या फाशीसाठी आंदोलन सुरूच राहील. असा इशाराही नागरिकांनी यावेळी दिला आहे. वाल्मिक कराडला अटक झाली आहे. परंतु त्याला तुरुंगात व्हिआयपी ट्रीटमेंट दिली जात असल्याच्या आरोपही नागरिकांनी यावेळी केला आहे.

बिहारपेक्षा महाराष्ट्र वाईट झालाय

बीडमध्ये कराडचे सहकारी 'बाप तो बाप होता है' असे स्टेटस ठेवू लागले आहेत. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ लागले आहेत. बीडमध्ये हे गुंड कंबरेला बंदूक लावून फिरत आहेत. ते बिहार एवढे वाईट नाही, तेवढा आता महाराष्ट्र वाईट झालाय. सरकारने यांची गुंडगिरी थांबवली पाहिजे. कराडसारख्या गुंडांमुळे सामान्य माणूसही अडचणीत आल्याचे नागरिकांनी यावेळी सांगितले आहे.

### मी जर प्रेस घेतली

बोलले जात नाही. त्यातच सपोनि.गणेश मुंडे यांनी एसपींच्या अधिपत्याखाली सुरु केलेल्या बीड पोलीस प्रेस या व्हाटस्अप ग्रुपवर शनिवारी सायंकाळी एक पोस्ट केली,ज्यामध्ये म्हटले होते की, 'या खासदाराची चड्डी सुध्दा जागेवर राहणार नाही, मी जर प्रेस घेतली तर'. असे म्हटले आहे. या पोस्टवर काही पत्रकारांनी विचारपूस केल्यानंतर सदरील पोस्ट मुंडे यांनी डिलिट केली, आणि स्थागुशाचे पो.नि.उस्मान शेख यांनी मुंडे यांना ग्रुपमधून काढून टाकले. सपोनि मुंडे यांनी एक प्रकारे खा.सोनवणे यांनाच धमकी दिली की, काय अशी चर्चा सुरु झाली आहे. आता यावर खा.सोनवणे काय भूमिका घेतात आणि अशा वाचाळ आणि धमकी देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर एसपी काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### तू एकदा पत्रकार

त्याला पहिल्यांदा पकडा, कारण तो खंडणीखोर आहे. सरकार म्हणून तुमच्यावर काही जबाबदारी आहे. पोलिसांना शरण आलेला आरोपी नेमका पकडला गेला की खरंच शरण आला आहे. पोलिसांनी जर त्याला खरच पकडलं असेल तर त्यांचं कौतुक आहे. पण वाल्मीक कराड शरण आला असेल तर इतर दोन आरोपीही शरण कसे आले. देशपांडे नावाचे सरकारी वकील केस घ्यायला घाबरत आहे. कारण यांची दादागिरी, गुंडगिरी आणि दडपशाही बीडमध्ये आहे. काल एक अधिकारी म्हणाला की जर त्यांनी पत्रकार परिषद घेतली तर माझी चड्डी राहणार नाही. माझी त्या अधिकाऱ्याला विनंती आहे की, तू एकदा पत्रकार परिषद घे.., त्यांनंतर तुला विविध ठिकाणी पोस्टिंग मिळण्याबाबत कोणाची मेहरबानी आहे, हे येणाऱ्या दोन दिवसांमध्ये समजून जाईल, असा इशारा बजरंग सोनवणे यांनी दिली.

दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास सध्या एसआयटीच्या माध्यमातून करण्यात येत आहे. मात्र एसटीमध्ये सामील करून घेण्यात आलेल्या काही पोलिसांवर बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी गंभीर आरोप केले आहेत. याप्रकरणी शनिवारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांनी एका खासदाराबाबत वादग्रस्त पोस्ट केली आहे. मात्र, त्यांनी स्पष्ट नाव घेणे टाळले. बीड पोलीस प्रेस या व्हाटस्अप ग्रुपवर गणेश मुंडे यांनी पोस्ट करताना म्हटले की, 'मी जर पत्रकार परिषद घेतली तर या खासदाराची चड्डी सुद्धा जागेवर राहणार नाही'. या पोस्टवर काही पत्रकारांनी विचारपूस केल्यानंतर ती वादग्रस्त पोस्ट गणेश मुंडे यांनी डिलीट केली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी गणेश मुंडेंना ग्रुपमधून बाहेर काढले. परंतु गणेश मुंडे यांचा रोख कोणावर होता? असा प्रश्न उपस्थित होत होता. अशातच बजरंग सोनवणे यांनी आज नाव न घेता थेट पत्रकार परिषद घेण्याचे आवाहन केले आहे.

### स्थानिक स्वराज्य

आहेत. २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांचा गाडा प्रशासक हाकत आहेत. यामुळे नागरिकांच्या अनेक नागरी समस्येबाबत तक्रारी आहेत. सुरुवातीला कोरोना रोगाचा प्रादुर्भाव, प्रभाग रचना आणि नंतर ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यामुळे या निवडणुका लांबविण्यात आल्याचे कारण देण्यात आले होते.आता काही महिन्यातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या शक्यता असल्याने त्या दृष्टीने राजकीय पक्षांनी तयारीला सुरूवात केली आहे. या प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात २२ जानेवारी रोजी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सुनावणी होणार आहे. आमच्या संस्थेला पुणे, पीसीएमसी, औरंगाबाद, नागपूर इत्यादी महानगरपालिकांमधील रहिवाशांकडून विविध नागरी समस्यांबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. स्थानिक पातळीवर निवडून आलेले लोकप्रतिनिधी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या आज च्या भव्य अशा पशुप्रदर्शनाचे आयोजन केले आहे गेवराईचे यांच्या हस्ते या पशुप्रदर्शनाचे उद्धाटन डॉ. डी आर कदम साहेब जिल्हा पशुसंवर्धन आयुक्त बीड,देशमुख साहेब जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जि प बीड यांच्या हस्ते होणार आहे या कार्यक्रमास डॉ. सुरवसे तालुका पशुधन अधिकारी पशुधन अधिकारी उपस्थित राहणार आहेत तरी या पशुप्रदर्शन चा लाभ घ्यावा असे आवाहान मुख्य संयोजक महेश बेंद्रे यांनी केले आहे

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध उपक्रम राबविले जात आहेत. या गुरुकुलाचे उद्धाटन आयुर्वेद व्यासपीठाचे प्रांत सहकार्यवाह सुप्रसिद्ध वैद्य. परेश देशमुख छत्रपती संभाजीनगर यांच्या शुभ हस्ते होणार आहे. या उदघाटन प्रसंगी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालीका डॉ. आदितीजी सारडा, आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्य. डॉ विवेक वसंतराव कुलकर्णी यांच्यासह सर्व अध्यापकवृंद उपस्थित असणार आहे. या गुरुकला मध्ये आयुर्वेदिय प्राचीन समिता, चरण समिता, सुश्रुत समिता, अष्टांगतहृदय, अष्टांगत संग्रह, आदी ग्रंथांचा अभ्यास केला जाणार आहे. अभ्यास करत असताना ग्रंथ वाचन कसे करायचे त्याचा अर्थ कसे समजायचे तसेच या ग्रंथाचा आजच्या काळानुसार कसा उपयोग होऊ शकतो हे उदाहरणसह शिकवले जाणार आहे. तसेच हे शिकत असताना सामाजिक मूल्य कशी जपावीत तसेच सहजीवन कसे जगावे यासंबंधीचे शिक्षण सहज संस्कारीत होणार आहेत. गुरुकुलाचे अधिक वैशिष्ठ म्हणजे हे होणारे भावी डॉक्टर स्वतःची सर्व कामे स्वतःच करणार आहेत. परिसंवाद, वादविवाद स्पर्धा गुरुकुलच्या दिनचर्येची सुरुवात पहाटे पाच वाजता योग प्राणायाम होणार आहे. विद्यार्थ्यांना मोबाईल मुक्त वातावरणात ठेवण्यात येणार आहे. दिवसभर विविध कार्यशाळा, अध्यापन सत्र, दिग्गज वैद्यांचे परिसंवाद, वादविवाद स्पर्धा इत्या कार्यक्रम होणार आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक व विविध कला गुण दर्शनाचे कार्यक्रम होणार आहे. आदित्य गुरुकुलम मध्ये अध्यापन व विविध विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी पुणे, नाशिक, अहिल्यानगर, लातूर येथील वैद्य मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये वैद्य. प्रयाग शेठीया, वैद्य. चिन्मय फडके, वैद्य. वेधस कोल्हटकर, वैद्य. प्रदीप पवार, वैद्य. श्रीरंग गलगली, वैद्य. गणेश मलवाडे , वैद्य. स्मिता साठे, वैद्य. मधुरा मिरजकर, वैद्य. धनंजय कुलकर्णी, वैद्य. विभव येवलेकर हे येणार आहेत. गैरहजर आहेत आणि प्रशासकीय कर्मचारी लोकांचे हित लक्षात न घेता मनमानीपणे कारभार हाकत असल्याच्या तक्रारी आहेत. असे सागर यांनी सांगितले. निवडणुका घेण्यास होणारा विलंब घटनाबाह्य जनहित याचिकेवर बोलताना, ॲड मुळ्ये म्हणाले, बहुतेक महानगरपालिका निर्वाचित प्रतिनिधींशिवाय आहेत. पाण्याची टंचाई, रस्ते आणि पदपथ यांसारख्या पायाभूत सुविधा आणि प्रशासकीय अधिकारी लोकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे.

या महापालिकांच्या निवडणुका प्रलंबित

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण - डोंबिवली, उल्हासनगर , भिवंडी-निजामपूर, वसई- विरार, मिरा-भाईंदर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मालेगाव, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी

या जिल्हा परिषद निवडणुका प्रलंबित

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, धाराशिव, लातूर, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा

### अधीक्षक नवनीत

असलेल्या प्रशांत महाजन यांची सुद्धा बदली केली आहे. महाजन यांची नियुक्ती आता नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे. प्रशांत महाजन हे केज पोलीस स्टेशनचे निरीक्षक होते, मात्र आता त्यांच्या जागी वैभव पाटील यांची बीड पोलीस निरीक्षक, प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर, पोलीस निरीक्षक सय्यद मजहर अली अबू तालीब हे नियंत्रण कक्षातून आता परळी ग्रामीण पोलीस स्टेशनचा पदभार घेणार आहेत. तसेच, पोलीस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे यांची केज पोलीस स्टेशनमध्ये बदली करण्यात आली आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आतापर्यंत ०७ जणांना बेड्या ठोकण्यात आलेल्या आहेत. परंतु, या प्रकरणातील आणखी एक आरोपी असलेला कृष्णा आंधळे हा अद्यापही बेपत्ता आहे. त्यामुळे त्याला लवकरात लवकर अटक करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. पण दुसरीकडे मात्र, या हत्या प्रकरणात नेमण्यात आलेल्या एसआयटीबाबत विरोधकांकडून अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. कारण या एसआयटीमधील काही अधिकारी हे वाल्मीक कराडला नमस्कार करणारी लोक आहेत, असा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. तर या एसआयटीमध्ये असलेले पीएसआय महेश विघ्ने आणि मनोजकुमार वाघ यांचे वाल्मीक कराड यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध असल्याचा आरोप शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

### राखेतील परळीत

वीट भट्टी चालवणाऱ्यांना ती सवलतीच्या दराने २०० रुपये प्रति टन दराने विकली जाते. या राखेच्या निविदा निघतात आणि सिमेंट कंपन्या ती राख घेऊन जातात. यातील खरी गोम पुढे आहे. ओली राख ज्या राखेच्या तलावात आणली जाते. ते गाव आहे दाऊदपूरमधील दाऊदपूर. श्रीमंतीचे अर्थकारण येथे दडले आहे.

औष्णिक वीज केंद्रापासून अगदी दोन किलोमीटरवरील दाऊदपूरमध्ये प्रत्येक घरावर राखेचा थर. या गावात घरे कमी आणि बंगले जास्त. तेही तीन मजली वाटावेत एवढ्या उंचीचे, आलिशान आणि टोलेजंग ! औष्णिक वीज प्रकल्पास जमीन दिल्याने प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरी लागलेला एक या गावातील. बाकीचे काही राखेच्या व्यवहारात. यात बहुतांश मंडळी बाहुबली. याच भागातील तरुणांनी हवेत गोळीबारही केला होता. समाजमाध्यमांवर छायाचित्र टाकून दहशत पसरविल्याचा गुन्हा अलीकडेच नोंदविण्यात आला. कोणी खंडणी मागतो, कोणी हाणामाऱ्या करतो, कोणाच्या नावावर अर्धमेला केल्याचा गुन्हा तर कोणी खुनाच्या आरोपात अडकलेला. भय निर्माण करणाऱ्या या प्रक्रियेमुळे परळीकर या व्यवहारावर ब्र शब्दही काढत नाहीत. परळीतील प्रत्येक निधीवर, प्रत्येक व्यवहाराचा कारभार वाल्मीक कराडकडे असतो. नेत्यांचे काम होकार किंवा नकार एवढेच.'करा की तेवढं काम,' अशी विनंती वजा धमकी आली की अधिकारीही लगबगीने कामे करतात.

२०२१ पर्यंत ही ओलीं राख मोफत देण्यास मुभा होती. पण त्यानंतर केंद्र शासनाने या राखेचा जाहीर लिलाव करावा अशी तरतूद केली. अलीकडेच केलेल्या लिलावामध्ये या ओल्या राखेचा दर ३५३ रुपये आला. पारसमध्ये ४१९, भुसावळमध्ये १९२ आणि नाशिकमध्ये ५५८ रुपये असे दर आहेत, असे औष्णिक वीज केंद्रातील राख व्यवस्थापन क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. परळीमध्ये ओली राख कंत्राटदारास उचलूच दिली जात नाही. स्थानिक पातळीवर काही जणांनी कंपन्या सुरू केल्या. त्यातून राख उचलणाऱ्यांची दहशत एवढी की, या भागात कोणी फिरकत नाही. ओली राख, विहिरीतील राख यामध्ये परळीतील वजनदार मंडळी गुंतलेली. त्यामुळे परळीकर या वाटेनेही जात नाही. या भागात दंडात बेटकुळी असणाऱ्या तरुणांची संख्या अधिक. ही मंडळी समर्थक. त्यामुळे यू-ट्यूबवर येणाऱ्या मजकुरावर पटकन मजकूरलिहिणारा याच भागातील.

शहरातील चौकात एक मनोरा. परळीकर त्याला 'टॉवर' म्हणतात. येथून 'बाहुबलीं'ची परळी हालते. येथे दीडशे दोनशे लोक उभे असतात. यातील बहुतेकांच्या हाती दोन मोबाइल असतात. हातात लाल- पिवळ्या रंगाचा दोरा घालणे आवश्यक. बाहुबलींचे कार्यकर्ते तसे धार्मिकवृतीचे. वैद्यनाथाची परळी ही ओळख जपणारे काही जण गंध लावतात, वाल्मीक कराड लावतात तसे.राजकीय पटलावर अडचणीत असल्यावर अधिक भपका करायचा असतो, हे धनंजय मुंडे आणि पंकजाताईंच्या कार्यकर्त्यांना सांगावे लागत नाही. तो डामडौल तालुक्याच्या पातळीवर परळीच्या चौकाचौकात भडकपणे फलकावर दिसतो. त्यावर हात लागला की राख हाती लागते.